लोकमत

योगेश कुंभेजकर : उमेदवार अथवा पक्षाच्या संमतीशिवाय जाहिरात करता येणार नाही प्रसारित

# राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण आवश्यक

लोकमत न्यूज नेटवर्क

**भंडारा :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करण्यासाठी भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघासाठी गोंदिया येथे माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समिती (एमसीएमसी) ची स्थापना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेत करण्यात आली आहे. माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातीलच इमारतीमध्ये आहे. राजकीय जाहिरातीचे प्रमाणीकरण करून घेण्यासाठी इच्छुकांनी आपले अर्ज दिलेल्या मुदतीत माध्यम प्रमाणिकरण समिती कक्षात सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

निवडणूक आयोगाने राजकीय प्रचार जाहिरातींबाबत नियमावली ठरवून दिली आहे. यानुसार राजकीय पक्ष व उमेदवारांना दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृकश्राव्य, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हॉइस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिराती तसेच मतदानाच्या आणि त्याच्या एक दिवस आधी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींना माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीकडून पूर्वमान्यता घेणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय पक्ष, उमेदवार किंवा प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या ४८ तास अगोदर प्रमाणीकरणासाठी जाहिरात व अर्ज सादर करावा. अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा इतर व्यक्तींनी किमान सात दिवस पूर्वी समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. समिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांत तो निकाली काढेल. जाहिरात नियमानुसार नसल्यास समितीला प्रमाणीकरण नाकारण्याचा अधिकार आहे. समितीच्या निर्णयाविरुद्ध राज्य समितीकडे अपील दाखल करता येते. मात्र त्यानंतर केवळ सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासांत राजकीय पक्ष किंवा उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन निर्मिती सादर करणे आवश्यक आहे.

टीव्ही चॅनेलद्वारे जाहिराती जर प्रसारित करावयाच्या असतील तर अशा जाहिराती समितीकडे प्रसारणाच्या तीन दिवस अगोदर प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक असून समिती याबाबत दोन दिवसांत निर्णय देईल. एखाद्या व्यक्तीला उमेदवार किंवा राजकीय पक्षांच्या संमतीशिवाय प्रचार करणाऱ्या जाहिराती देता येणार नाहीत.

## आचारसंहिता निर्देशांचे पालन



जाहिरातीमध्ये आदर्श आचारसंहितेनुसार दिलेल्या निर्देशांचे पालन होणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने राष्ट्रीय एकात्मतेला हानी पोहोचविणाऱ्या बाबी, धार्मिक भावना दुखावणे, भारतीय घटनेचा अवमान करणे, गुन्हा दाखल करण्यास प्रवृत्त करणे, कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणे, गुन्हेगारीचे उदात्तीकरण, महिलांचे चुकीचे चित्रण, तंबाखूजन्य किंवा नशा आणणाऱ्या पदार्थांच्या जाहिराती, हुंडा, बालविवाह यांना उत्तेजन देणाऱ्या जाहिराती प्रसारित करण्यास प्रतिबंध आहे. इतर देशांवर टीका नसावी. न्यायालयाचा अवमान जाहिरातीतून होता कामा नये. राष्ट्रपती व न्याय संस्था यांच्याबाबत साशंकता नसावी. राष्ट्रीय एकात्मतेला, सौहार्दतेला आणि एकतेला बाधा पोहोचविणारा मजकूर यात नसावा. सुरक्षा दलातील कोणतेही सैनिक, व्यक्ती, अधिकारी यांची अथवा सैन्य दलाचे छायाचित्र जाहिरातीत नसावे. कोणत्याही व्यक्तीच्या खासगी-वैयक्तिक जीवनातील घटनांना धरून त्यावर भाष्य नसावे. व्हिडीओ व्हॅनद्वारे प्रचारासाठी उपयोगात आणले जाणारे साहित्य याचे माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. या वाहनाची निवडणूक विभागाकडून रीतसर परवानगी घ्यावी लागणार आहे.

## विहित नमुन्यात करावा लागणार अर्ज



प्रमाणीकरणासाठीचा अर्ज हा विहित नमुन्यात सादर करावा लागेल. त्यात अर्जदाराचे नाव व पत्ता, उमेदवार किंवा पक्षाचे नाव किंवा जाहिरात एखादी संस्था-ट्रस्ट-संघटना यांच्याकडून दिली जात असल्यास त्यांचे नाव, मतदारसंघाचे नाव, राजकीय पक्षाच्या मुख्यालयाचा पत्ता, ज्या चॅनल-केबल नेटवर्कवर जाहिरात प्रसारित करायची आहे, त्याबाबत स्पष्ट माहिती, कोणत्या उमेदवाराच्या हितासाठी जाहिरात करण्यात आली आहे त्याबाबत माहिती, जाहिरात सादर करीत असल्याचा दिनांक, जाहिरातीसाठी वापरण्यात आलेली भाषा, त्याच्या ट्रान्स्क्रिपच्या साक्षांकित दोन प्रती, जाहिरातीचे शीर्षक, जाहिरात निर्मितीचा खर्च, जाहिरात जर चॅनेलद्वारे प्रसारित केली जात असेल तर किती वेळा ती प्रसारित केली जाणार, त्याचे प्रस्तावित केलेले दर, यासाठी लागलेला एकूण खर्च आदी माहिती अर्जदाराने निवडणूक आयोगाने दिलेल्या विहित नमुन्यात स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.

लोकमत

पॉलि-क्लिक माझा हक्क



# मी केंद्रावर जाऊनच मतदान करणार

अपंग, ८५ वर्षांवरील मतदार केंद्रावर उपस्थित राहू शकत नाहीत, त्यांच्यासाठी टपाली मतदान करण्याबाबतचा अर्ज भरून घेण्याचे काम डहाणू तालुक्यात सुरू आहे. घोलवड गावच्या मणीबाई शंकर खोत या टोकेपाडा येथील मतदार ९० वर्षांच्या आहेत. त्यांनी वयाची सबब पुढे न करता, मतदान केंद्रावर जाऊन हक्क बजावण्याचा निश्चय बोलून दाखवला. तशा अर्जावर सही केली. त्या शेतकरी असून आताही शेतीची कामे करतात, त्यांना चष्मा लागलेला नाही.

# तळा येथे मतदान जनजागृती कार्यक्रम

तळा, (वा.) लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता जास्तीत जास्त लोकांनी नैतिकदृष्ट्या मतदान करण्यास प्रवृत्त व्हावे यासाठी निवडणूक आयोगाच्या माध्यमातून देश पातळीवर स्वीप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि. २७ मार्च रोजी द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वीप पथकाच्या माध्यमातून तळा परिसरात मतदार जनजागृती रॅलीच्या आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीच्या प्रारंभी द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथील प्रभारी प्राचार्य भगवान लोखंडे यांनी मतदार जनजागृतीची लोकशाहीच्या सशक्तीकरणामधील भूमिका स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी याप्रती बांधीलकी कायम ठेवावी, असे आवाहन केले. यावेळी तळा तहसीलदार स्वाती पाटील यांनी या स्वीप पथकाच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना व उपस्थितांना देऊन लोकशाहीचा हा निवडणुकीचा उत्सव कार्यक्षम रीतीने व प्रभावी रीतीने साजरा करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन केले.



## स्वीप पथकाच्या विविध उपक्रमांची माहिती

नोडल अधिकारी दीपाली शेळके यांनी या स्वीप पथकाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. राजाराम थोरात, डॉ. दिवाकर कदम, प्रा. नितीन पाटील, प्रा. धोंडीबा आंबेगावे, द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी यांनी मेहनत घेतली. यावेळी तहसीलदार स्वाती पाटील, निवडणूक नायब तहसीलदार जितेंद्र टेंबे, मंडल अधिकारी चंद्रकांत राऊत, तलाठी किशोर मालुसरे, भारत जाधव, तलाठी अनिल घोडे, रवी बावदाने, प्राध्यापकवृंद व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# तळा येथे स्विप पथक अंतर्गत मतदान जनजागृती रॅली

**दैनिक युवक आधार**
**तळा वार्ताहर**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता जास्तीत जास्त लोकांनी नैतिकदृष्ट्या मतदान करण्यास प्रवृत्त व्हावे यासाठी निवडणूक आयोगाच्या माध्यमातून देश पातळीवर स्वीप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या स्वीप कार्यक्रमांतर्गत तळा तालुक्यामध्येही स्वीप पथक स्थापन करण्यात आले आहे. या स्वीप पथकाच्या नूडल ऑफिसर म्हणून श्रीमती दिपाली हरिश्चंद्र शेळके पर्यवेक्षक, एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय तळा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकामध्ये द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ राजाराम महादेव थोरात, डॉ .दिवाकर धोंडू कदम तसेच जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा येथील डॉ. सचिन बंगाळे, डॉ. नसरीन बानो शेख यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कार्यक्रमा अंतर्गत तळा तालुका परिसरात मतदार जनजागृती करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करून स्वीप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तळा तहसीलदार श्रीमती स्वाती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तळा तहसील कार्यालयात वेळोवेळी सहविचार सभांचे आयोजन करून नियोजन करण्यात आले आहे. दिनांक २७ मार्च २०२४ रोजी द .ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वीप पथकाच्या माध्यमातून तळा परिसरात मतदार जनजागृती रॅलीच्या आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या प्रारंभी द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथील प्रभारी प्राचार्य भगवान लोखंडे यांनी मतदार जनजागृतीची लोकशाहीच्या सशक्तीकरणामधील भूमिका स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी याप्रती बांधीलकी कायम ठेवावी असे आवाहन केले. याप्रसंगी तळा तहसीलदार श्रीमती स्वाती पाटील यांनी या स्वीप पथकाच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना व उपस्थितांना देऊन लोकशाहीचा हा निवडणुकीचा उत्सव कार्यक्षम रीतीने व प्रभावी रीतीने साजरा करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले. यावेळी नोडल अधिकारी दिपाली हरिश्चंद्र शेळके यांनी या स्वीप पथकाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. राजाराम थोरात, डॉ. दिवाकर कदम, प्राध्यापक नितीन पाटील, प्राध्यापक डी. टी. आंबेगावे, द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. या स्वीप पथकाच्या माध्यमातून काढण्यात आलेल्या प्रबोधन रॅलीच्या माध्यमातून तळा बाजारपेठ तळा नगरपंचायत व तळा मधली आळी या परिसरात घोषणा व रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. यावेळी तहसीलदार स्वाती पाटील, निवडणूक नायब तहसीलदार श्री जितेंद्र टेंबे, श्री चंद्रकांत राऊत (मंडल अधिकारी सोनसडे), श्री किशोर मालुसरे (तलाठी तळा), श्री भारत जाधव (निवडणूक लिपिक), श्री अनिल घोडे (तलाठी), श्री रवी बावदाने (शिपाई ), प्राध्यापक वृंद व कार्यालयीन कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.



# तळा येथे स्विप पथक अंतर्गत मतदान जनजागृती रॅली

तळा कृष्णा भोसले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता जास्तीत जास्त लोकांनी नैतिकदृष्ट्या मतदान करण्यास प्रवृत्त व्हावे यासाठी निवडणूक आयोगाच्या माध्यमातून देश पातळीवर स्वीप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या स्वीप कार्यक्रमांतर्गत तळा तालुक्यामध्येही स्वीप पथक स्थापन करण्यात आले आहे. या स्वीप पथकाच्या नूडल ऑफिसर म्हणून श्रीमती दिपाली हरिश्चंद्र शेळके पर्यवेक्षक, एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय तळा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकामध्ये द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ राजाराम महादेव थोरात, डॉ .दिवाकर धोंडू कदम तसेच जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा येथील डॉ. सचिन बंगाळे, डॉ. नसरीन बानो शेख यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कार्यक्रमा अंतर्गत तळा तालुका परिसरात मतदार जनजागृती करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करून स्वीप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तळा तहसीलदार श्रीमती स्वाती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तळा तहसील कार्यालयात वेळोवेळी सहविचार सभांचे आयोजन करून नियोजन करण्यात आले आहे. दिनांक २७ मार्च २०२४ रोजी द .ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वीप



पथकाच्या माध्यमातून तळा परिसरात मतदार जनजागृती रॅलीच्या आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या प्रारंभी द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथील प्रभारी प्राचार्य भगवान लोखंडे यांनी मतदार जनजागृतीची लोकशाहीच्या सशक्तीकरणामधील भूमिका स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी याप्रती बांधीलकी कायम ठेवावी असे आवाहन केले. याप्रसंगी तळा तहसीलदार श्रीमती स्वाती पाटील यांनी या स्वीप पथकाच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना व उपस्थितांना देऊन लोकशाहीचा हा निवडणुकीचा उत्सव कार्यक्षम रीतीने व प्रभावी रीतीने साजरा करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले. यावेळी नोडल अधिकारी दिपाली हरिश्चंद्र शेळके यांनी या स्वीप पथकाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. राजाराम थोरात, डॉ. दिवाकर कदम, प्राध्यापक नितीन पाटील, प्राध्यापक डी. टी. आंबेगावे, द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. या स्वीप पथकाच्या माध्यमातून काढण्यात आलेल्या प्रबोधन रॅलीच्या माध्यमातून तळा बाजारपेठ तळा नगरपंचायत व तळा मधली आळी या परिसरात घोषणा व रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. यावेळी तहसीलदार स्वाती पाटील, निवडणूक नायब तहसीलदार श्री जितेंद्र टेंबे, श्री चंद्रकांत राऊत (मंडल अधिकारी सोनसडे), श्री किशोर मालुसरे (तलाठी तळा), श्री भारत जाधव (निवडणूक लिपिक), श्री अनिल घोडे (तलाठी), श्री रवी बावदाने (शिपाई ), प्राध्यापक वृंद व कार्यालयीन कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

# तळा येथे स्विप पथक अंतर्गत मतदान जनजागृती रॅली



तळा -

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता जास्तीत जास्त लोकांनी नैतिकदृष्ट्या मतदान करण्यास प्रवृत्त व्हावे यासाठी निवडणूक आयोगाच्या माध्यमातून देश पातळीवर स्वीप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या स्वीप कार्यक्रमांतर्गत तळा तालुक्यामध्येही स्वीप पथक स्थापन करण्यात आले आहे. या स्वीप पथकाच्या नूडल ऑफिसर म्हणून श्रीमती दिपाली हरिश्चंद्र शेळके पर्यवेक्षक, एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय तळा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकामध्ये द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ राजाराम महादेव थोरात, डॉ .दिवाकर धोंडू कदम तसेच जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा येथील डॉ. सचिन बंगाळे, डॉ. नसरीन बानो शेख यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कार्यक्रमा अंतर्गत तळा तालुका परिसरात मतदार जनजागृती करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करून स्वीप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तळा तहसीलदार श्रीमती स्वाती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तळा तहसील कार्यालयात वेळोवेळी सहविचार सभांचे आयोजन करून नियोजन करण्यात आले आहे. दिनांक २७ मार्च २०२४ रोजी द .ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वीप पथकाच्या माध्यमातून तळा परिसरात मतदार जनजागृती रॅलीच्या आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या प्रारंभी द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथील प्रभारी प्राचार्य भगवान लोखंडे यांनी मतदार जनजागृतीची लोकशाहीच्या सशक्तीकरणामधील भूमिका स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी याप्रती बांधीलकी कायम ठेवावी असे आवाहन केले. याप्रसंगी तळा तहसीलदार श्रीमती स्वाती पाटील यांनी या स्वीप पथकाच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना व उपस्थितांना देऊन लोकशाहीचा हा निवडणुकीचा उत्सव कार्यक्षम रीतीने व प्रभावी रीतीने साजरा करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले. यावेळी नोडल अधिकारी दिपाली हरिश्चंद्र शेळके यांनी या स्वीप पथकाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. राजाराम थोरात, डॉ. दिवाकर कदम, प्राध्यापक नितीन पाटील, प्राध्यापक डी. टी. आंबेगावे, द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. या स्वीप पथकाच्या माध्यमातून काढण्यात आलेल्या प्रबोधन रॅलीच्या माध्यमातून तळा बाजारपेठ तळा नगरपंचायत व तळा मधली आळी या परिसरात घोषणा व रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. यावेळी तहसीलदार स्वाती पाटील, निवडणूक नायब तहसीलदार श्री जितेंद्र टेंबे, श्री चंद्रकांत राऊत (मंडल अधिकारी सोनसडे), श्री किशोर मालुसरे (तलाठी तळा), श्री भारत जाधव (निवडणूक लिपिक), श्री अनिल घोडे (तलाठी), श्री रवी बावदाने (शिपाई), प्राध्यापक वृंद व कार्यालयीन कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.